भोर येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब यांचे कोर्टात.

रे.दि.मुं.नं. १४/२०२४

श्री किरण जगन्नाथ खोपडे वादी

विरूध्द.

श्री धनंजय बाळासोा भिलारे प्रतिवादी

सदरचे कामी वादीच्या दाव्यास प्रतिवादी नंबर १ व २ तर्फे कैफियत व नि. ५ चे अर्जास जबाब येणेप्रमाणे

१ वादीचा दावा खरा व कायदेशीर नाही तो या प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. या कैफियतीने दाव्यातील व नि. ५ मधील कबूल केलेले मजकुरा व्यतिरीक्त उर्वरित सर्व मजकुर सदर प्रतिवादी स्पष्टपणे नाकारीत आहेत.

२. वादीने खरी वस्तुस्थिती लपवून ठेवून सदरचा दावा दाखल केला आहे त्यामुळे वादीचा नि. ५ चा अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

३. दाव्याचे कलम १ मधील दावा मिळकतीचे दिलेले वर्णन, क्षेत्र, आकार व चतु:सिमा ढोबळ मानाने ख—या बरोबर आहेत.

४. दावा मिळकतीची केलेली आकारणी चुकीची आहे दावा मिळकतीची योग्य ती आकारणी केल्याशिवाय वादीचा दावा कायदयाने चालणार नाही.

५. दाव्याचे कलम २ मधील ता २/५/२०२३ रोजी खरेदीचा दस्त नंबर २१००/२०२३ चा नोंदविल्याचे कथन खरे आहे.

६. दाव्याचे कलम २ मधील ता ३१/८/२०२१ रोजी प्रतिवादी नंबर १ यांना प्रतिवादी नंबर ४,८ व ९ यांनी साठेखत लिहून दिल्याचे वादीचे कथन कायदेशीर नाही मुळात साठेखत मान्य न करता या प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादींना तथाकथीत साठेखताने कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्तच होत नाहीत अशा तथाकथीत साठेखताचे आधारे दाखल केलेला हा दावा रद्द होणेस पात्र आहे.

Order
Read and record

JADHAV MEENA WAMAN Digitally signed by JADHAV MEENA WAMAN Date: 2024.12.13 11:19:20 +0530

Jt. C.J.J.D. Bhor